**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०९**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २६ /०८/२०१०

प्रति,
मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ९ सोमवार दि. ३०/०८/२०१० रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**सोमवार दिनांक- ३०/०८/२०१० ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ५४ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक०७ मंगळवार दिनांक२०/०७/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०८ शनिवार दिनांक ३१/०७/२०१० रोजीच्या सभाचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ५५ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६२ मध्ये केडगांव येथील हरिजन वस्ती येथे स्त्रिया व पुरूषांकरिता प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ५६ | अहमदनगर महानगरपालिकेचे राणी लक्ष्मीबाई चौक भूषणनगर केडगाव येथील महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी भाडे डिपॉसिट वसुली इत्यादी करारनाम्यातील अटी/ शर्तीचे मसुदयास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५७ | अहमदनगर महानगरपालिकेचे औरंगाबाद रोड वरील मुख्य इमारतीवर नेटवर्क सुधारणा कामासाठी आय.बी. एस. सिस्टीम बसविणेस परवानगी मिळणेबाबत एअरटेल अभ्युदय टेलीकॉम यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ५८ | अर्जदार श्री.श्रीकृष्ण रेवजी पवार,रा. बायजाबाई सोसायटी घर नं.११०अ १ यांचे घरास नळ कनेक्शन घेतलेले नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००४-२०१० अखेर ( वॉर्ड क्र.६१ बील क्रमांक ५११) पाणीपटटी रूपये १६,४७६/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५९ | अर्जदार श्री. श्रीकृष्ण रेवजी पवार व श्री. बाळासाहेब पवार , रा. बायजाबाई सोसायटी प्लॉट नं.१३५ यांचे मोकळया भुखंडावर नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००३-२०१० अखेर ( वॉर्ड क्र.६१ बील क्रमांक ५९६) पाणीपटटी रूपये ६,०००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ६० | अहमदनगर महानगरपालिकेचे तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत गणपती देवस्थान माळीवाडा परिसराचे सुशोभिकरण करणेचे कामास, अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ९०,८३,७३९/- चे खर्चास मंजूरी देवुन सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष नियोजन समिती यांचेकडेस पाठविणेस मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६१ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता भुल तज्ञांची पॅनलशिपवर दिनांक ०६/०७/२०१० ते दिनांक ०५/०१/२०११ अखेर सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रूपये ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २००/- याप्रमाणेचे मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये सन २०१०-२०११ या कालावधीत आयात होणा-या जकात पात्र मालावर महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत अथवा जकात अभिकर्तामार्फत पुढिल एक महिन्याचे कालावधीस्तव मुदतवाढ देवुन जकात वसुली करणे तसेच जकात ठेक्याची ठरविलेल्या देकार रकमे बाबत प्राप्त पत्रा विषयी ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] मा.स्थायी समिती सभा क्रमांक०७ मंगळवार दिनांक२०/०७/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०८ शनिवार दिनांक ३१/०७/२०१० रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ५५ ते ६२ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०९

विषय क्रमांक- ५४ सोमवार दिनांक-३०/८/२०१०

ठराव क्रमांक- ५४ सोमवार दिनांक-३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०७ मंगळवार दिनांक २०/०७/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०८ शनिवार दिनांक ३१/०७/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०७ मंगळवार दिनांक २०/०७/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०८ शनिवार दिनांक ३१/०७/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देणे आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- मागील सभा दिनांक २०/७/२०१० व दिनांक ३१/७/२०१० रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मागील सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्रमांक ७ मंगळवार दिनांक २०/०७/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०८ शनिवार दिनांक ३१/०७/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त सर्वानुमते कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०७ मंगळवार दिनांक २०/०७/२०१० व मा.स्थायी समिती सभा क्रमांक ०८ शनिवार दिनांक ३१/०७/२०१० रोजीच्या सभांचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९

विषय क्रमांक-५५ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक -५५ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६२ मध्ये केडगांव येथील हरिजन वस्ती येथे स्त्रिया व पुरूषांकरिता प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. सार्व. बांध. वि. जा.क्र. १८ दि.३०/७/१०
प्रेषक- शहर अभियंता, प्रति- नगरसचिव
प्रस्तावना-विषय- निविदा मंजुरी बाबत.

कामाचे नांव :- प्रभाग क्र.६२ मध्ये केडगाव येथील हरिजन वस्ती येथे स्त्रिया व पुरूषांकरिता प्रत्येकी ५ सिट्सचे शौचालय बांधकाम करणे.

उपरोक्त विषयी खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा.आयुक्त साहेब यांची दिनांक २२/०३/२०१० अन्वये मंजूरी.
२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू.= १४,३७,५४३/-
३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. = १४,०९,९८७/-
४] तांत्रिक मान्यतेची दरसुची : २०१०-११
६] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू. : १३,४२,८४६=००
७] निविदा प्रसिध्दी तारीख : दिनांक ३०/४/२०१० दै. सामना
८] निविदा विक्री कालावधी : ३०/४/२०१० ते १५/५/२०१० (१५ दिवस)
९] निविदा स्विकारण्याची तारीख : १८/५/२०१०
१०] निविदा उघडण्याची तारीख : २१/६/२०१०
११] कामाची मुदत : ९ महिने
११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | श्री. अभिजीत जोशी , अहमदनगर | २०.००% जादा |
| २ | श्री. सुनिल राउत, अहमदनगर | २१.०० %जादा |
| ३ | श्री. म्हस्के विजय, अहमदनगर | २२.०० %जादा |

वरील तक्त्याच्या अनुषंगाने श्री. अभिजीत जोशी, अहमदनगर यांचा देकार सर्वात कमी म्हणजे निविदा रकमेपेक्षा २०.०० % जादा आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन २००९-१० चे दरसुची नुसार तयार करण्यात आले होते. तथापी सन २००९-१० ची सुधारित दरसुची उपलब्ध झाल्याने सन २००९-१० चे सुधारित दरसुचीशी तुलना केली असता सदर दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.०० % जादा येतात.

तरी कमी दराचे निविदा धारकास दराचे वाटाघाटीसाठी संबंधीत ठेकेदाराला अंतिम दर लेखी कळविणे बाबत जा.क्र. ५६० दि.२३/६/२०१० रोजी दराचे वाटाघाटीसाठी पत्र दिले संबंधीत ठेकेदार यांनी दि.२४/६/२०१० रोजी सदरचे काम निविदा दरापेक्षा ५.००% जादा दराने काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे. सदर प्रस्ताव मा. छाननी समिती समोर दि. /०६/२०१० रोजी ठेवला असता मा. छाननी समितीने सदरचे काम निविदा दराच्या ५.००% जादा दराने काम देणेची शिफारस करण्यात आली आहे.

सुधारित देकारानुसार मा. छाननी समितीने शिफारसीप्रमाणे सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

| निविदा रक्कम | कमी दराचे निविदा धारक व त्यांनी अंदाजपत्रकापेक्षा भरलेला दर | प्रचलित दरसुचीनुसार येणारी रक्कम रूपये | रकाना क्र. ३ व ५ यामधील फरक रक्कम व % | प्रचलीत दरानुसार होणारी % कमी / जादा व रक्कम | मा. छाननी समितीची शिफारस मुळ निविदा दरापेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १३,४२,८४६/- | श्री. अभिजीत जोशी २०.०० % जादा | १३,४२,८४६/- | निरंक % | ५% जादा रू. ६७,१४२/- | ५% जादा |

तरी मा. छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा ठेकेदारास निविदा दरापेक्षा ५% जादा दराने देणेस मा.छाननी समितीने केलेल्या शिफारसीनुसार सदरची निविदा मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.३०/७/१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ६२ मधील हरिजन वस्ती येथे स्त्रिया व पुरूषांसाठी प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- आलेल्या कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्टानुसार कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ६२ मधील केडगांव हरिजन वस्ती येथे स्त्रिया व पुरूषांसाठी प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणे कामी आलेल्या कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ६२ मध्ये केडगांव येथील हरिजन वस्ती येथे स्त्रिया व पुरूषांकरिता प्रत्येकी पांच सिटचे शौचालय बांधणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता तुलनात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक श्री. अभिजित जोशी,अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती कमी करून दिलेल्या मुळ निविदा दरापेक्षा ५%(पांच टक्के) जादाचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९**

विषय क्रमांक -५६ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक - ५६ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे राणी लक्ष्मीबाई चौक भूषणनगर केडगाव येथील महिला जिम खाजगी तत्वावर चालविण्यांस देणेकामी भाडे डिपॉसिट वसुली इत्यादी करारनाम्यातील अटी / शर्तीचे मसुदयास मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

दिनांक १३/४/२०१०

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रं.४ अंतर्गत, राणी लक्ष्मीबाई चौक, भुषणनगर, केडगांव येथे अहमदनगर महानगरपालिकेने बांधलेली महिला जिम प्राधान्याने महिला बचत गटास अथवा संस्थेस भाडे तत्वावर चालविण्यास देणे बाबतचा भाडेपटटा करार मसुदा पसंतीसाठी सादर.

**भाडेपटटा करारनामा मसुदा**

**भाडेपटटा करार-**

भाडेपटटा अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मिळकती बाबत दर महिन्याचे भाडे रक्कम रू. ................ अक्षरी रूपये .................. मात्र चे आज .......वार दि. / /२०१० ते ............... ची मुदत महिने ११ साठीचा.

**लिहून घेणार-**

अहमदनगर महानगरपालिके तर्फे
मा.आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका, अ.नगर

**लिहून देणार-**

--------------------------------------
--------------------------------------
--------------------------------------

**कारणे करारनामा लिहून देणार की,**

१. **मिळकतीचे वर्णन-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे केडगाव भुषणनगर येथे अहमदनगर महानगरपालिकेने बांधलेली महिला जिम क्षेत्र ८२.५ m२ अत्याधुनिक व्यायाम साहित्यासह भाडेतत्वावर चालविण्यास दिली आहे.

| अ.क्र. | साहित्य तपशील | नग | किंमत |
|---|---|---|---|
| 1 | MULYIHIP 60KG SSW-231 | 1 | 38,879/- |
| 2 | ADUCTOR/ABDUCTOR- 60KG SSW-336 | 1 | 55,354/- |
| 3 | SEATED LEG PRESS SSW-223 | 1 | 43,723/- |
| 4 | ASSISTED CHIN UP/DIPS 80KG SSW-200 | 1 | 39,909/- |
| 5 | LEG CUR / EXTESION 80KG SSW-226 | 1 | 48,403/- |
| 6 | BUTTER RLY / PEG OEC 80KG SSW-226 | 1 | 41,522/- |
| 7 | ABDOMEN CRUNCH 60KG SSW-232 | 1 | 42,988/- |
| 8 | GLUTES MACHINE 80KG SSW-235 | 1 | 42,110/- |
| 9 | HYPER EXTENSION FW-303 | 1 | 12,325/- |
| 10 | ABDOMEN CRUNCH BENCH FW-302 | 1 | 19,958/- |
| 11 | ELECTRONIC TREADMILL HCA- 502 | 1 | 1,55,200/- |
| 12 | BELT MASSAGER HCA-502 | 1 | 24,504/- |
| 13 | MASSAGER HCA-503 | 1 | 29,494/- |
| 14 | EXCER CYCLE HCA-504 | 1 | 7,275/- |
| 15 | STEP CLIMBER HCA-509 | 1 | 29,197/- |
| 16 | AERO RIDER HCA-510 | 1 | 10,990/- |
| 17 | DUMBELL RACK FA-402 | 1 | 14,065/- |
| 18 | TWISTER SINGLE AND SEATED HCA-507 | 1 | 18,048/- |
| 19 | M.S. DUMMELS WTU-606 42KG. | 42kg | 6,518/- |
| | | 4% Tax | 27,218/- |
| | | Total Rs. | 7,07,680/- |

येणे प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेने बांधलेली महिला जिम वरील अत्याधुनिक व्यायाम साहित्यासह जागाभाडे दरमहा रू...................अनामत रक्कम रू..................अधिक सेवाकर व महानगरपालिकेने वेळोवेळी केलेली भाडेवाढ मान्य राहिल. सदरील मिळकतीवर नियमानुसार होणारा मालमत्ताकर लिहून देणार यांनी भरावयाचा आहे.

२. सदर जिमचे दरमहा आगाउत्र भाडे दरमहा १० तारखेच्या आत देत जाउत्न त्याची लिखीत पावती घेत जाईन. विना पावती भाडे पोहोच झालेची तोंडी सबब सांगणार नाही. तसेच भाडे वेळेत न दिल्यास भाडे रकमेवर दरमहा १० टक्के व्याज देण्याची जबाबदारी राहिल. यातुनही दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे देणेचे राहिल्यास त्वरीत सदर जागा तुमचे कब्जात देईन किंवा मनपास त्याचा तत्काळ कब्जा घेण्याचा हक्क राहिल.

३. मुदती अखेर म्हणजेच करारनामा केल्याचे तारखेनंतर बरोबर ११ महिन्यांनी जिमचा कब्जा मनपास देईन. जर कब्जा मुदतीत मनपास सदर जागेची जरूरी भासलेस नुकसान भरपाई न मागता अथवा अन्य कोणेतीही सबब न सांगता मुदतीपूर्वी सदरची जिम खाली करून मनपाच्या कब्जात देईन. त्यास मी कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार करणार नाही.

४. सदर करारनाम्याची मुदत वाढवुन देण्याचे अधिकार मा.आयुक्त अ.नगर मनपा यांचेकडे राहतील.

५. सदर जिमध्ये मनपाच्या लेखी परवानगी शिवाय बांधकाम अथवा दुरूस्तीमध्ये फेरबदल करता येणार नाही.

६. ताब्यात घेतलेले व्यायाम साहित्य करारनामा कालावधी संपल्यानंतर जसेच्या तसे ताब्यात द्यावे लागेल. अन्यथा साहित्याबाबत झालेली दुरूस्ती अथवा नविन खर्च आपले डिपॉझीट मधुन वसुल करण्यात येईल व त्याशिवयाय जादा नुकसान झाल्यास मी भरण्यांस तयार आहे.

७. सदर जिम ही खास महिलांकरिता असल्यामुळे जिम मध्ये जिम सुरू होणे आगोदर प्रशिक्षित महिला प्रशिक्षक उपलब्ध करून द्यावी लागेल.

८. जिम सुरू व बंद करण्याचे वेळेचे सर्व अधिकार मा.आयुक्त,अ.नगर मनपा यांचेकडे राहतील.

९. जिम चालविण्यास घेणारा महिला बचत गट अथवा संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक असुन, त्यांनी कमीत कमी १ वर्षाचे बॅक स्टेटमेंट द्यावे लागेल.

१०. जिमचे लाईट बिल भरण्याची व इतर देखभाल विशेषतहा जिम मध्ये व्यायामासाठी येणा-या महिलांची संरक्षणाची जबाबदारी सर्वस्वी चालकावरच राहिल.

११. जिम व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवणे, तसेच जिममधील खुल्या जागेत १० झाडे लावुन त्यांचे संगोपन करणे चालकावर बंधनकारक राहिल.

१२. जिममध्ये व्यायाम करताना एखाद्या महिला खेळाडुस दुखापत अथवा नैसर्गिक आपत्ती झाल्यास, व त्या अनुशंगाने कोणतीही कोर्ट कार्यवाही झाल्यांस त्याची सर्व जबाबदारी चालकावर राहिल.

१३. सदर जिम चालकधारकाने मनपाच्या अटी व शर्तीनुसार रू.१००/- चे स्टॅप पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

१४. वेळोवेळी करारनामा अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त, अ.नगर महानगरपालिका यांचेकडेस राहतील.

१५. सदरचा करारनामा मी करून देत असुन जर माझ्याकडून कराराचे उल्लंघन अथवा मनपास आर्थिक नुकसान झाल्यास सदर अर्थिक नुकसानीस माझे इस्टेट, वारस वहिवाटदार, मृत्युपत्र चालविणारे यांचेवर लागु व बंधनकारक असुन, सदर नुकसान त्यांचे स्थावर जंगम मालमत्तेतुन वसुल करावा. त्यास त्याची हरकत राहणार नाही. तरी लिहुन दिलेला करार मी अक्कल हुशारीने, स्वसंतोषाने विना दडपण आज मुक्कामी अहमदनगर येथे लिहुन दिला आहे.

साक्षीदार :- १ सही :- १

२. २.

क्रीडा प्रमुख करितां :- उपरोक्त शर्ती व अटीनुसार विषयांकित नमुद व्यायाम शाळा भाडे तत्वावर देणे बाबतचा "भाडेपटटा करारनामा मसुदा" (Draft) मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस मंजुरी मिळण्याचे आदेशार्थ सादर. दि.१३/४/२०१०

मा.प्रभाग अभियंता यांचे मार्फत सादर

कनिष्ट अभियंता :- वरील करारनाम्या संदर्भी नोंदणीकृत अथवा विहीत मार्गासाठी कोर्ट विभाग यांचा अभिप्राय घेणेस्तव व करारनामातील दरमहा जागाभाडेसाठी मा. नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे योग्य वाटते तथापी पुढील आदेशार्थ स. सादर. दि.१४/४/१०

मा.उपशहर अभियंता :- क. अभियंता यांच्या रिपोर्ट नुसार कोर्ट विभाग व मा.नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेणे योग्य वाटते. दि. ५/५/२०१०

मा. शहर अभियंता :- अहवालाप्रमाणे कोर्ट विभाग व नगररचना विभाग यांचा अहवाल घेवुन मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य दि.५/५/२०१०

म.न.पा. विधी सल्लागार :- सविनय सादर, सदरील करारनाम्यातील अटी व शर्ती नियमानुसार असून त्यानुसार कार्यवाही करणे उचित होईल. दि.१५/५/२०१०

नगररचनाकार :- सादर, विषयांकित सदर व्यायाम शाळा ही मनपा निधीतुन बांधलेली आहे असे दिसते सबब ही जागा मनपास हस्तातंरित झाली आहे की याची खात्री करावी व व्यायाम शाळेचे आराखडे इकडे सादर करावेत म्हणजे सदर प्रकरणाबाबत पुढील कार्यवाही करता येईल.

क्रीडा प्रमुख :- शाखा अभियंता सादर, सदर व्यायाम शाळेबाबत मा.नगरररचनाकार यांचे शे-याप्रमाणे पूर्तता आपले अधिपत्या खाली असून तसेच भाडे आकारणी बाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्रायास्तव सादर.

नगररचनाकार :- विषयांकित प्रकारण मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत बांधलेल्या व्यायाम शाळेचे भाडे ठरविण्यासंबंधी आहे. मुळातच नागरिकांना या प्रस्तावाच्या माध्यमातुन व्यायामाची सुविधा मिळणार आहे. त्यामुळे या सुविधा प्राधान्याचे मुल्यांकन नेहमीच्या भाडेकरी पध्दतीने करणे योग्य होणार नाही. जी. संस्था / बचतगट ही व्यायाम शाळा वापरा व हस्तांतरीत करा / किंवा भाडेतत्वावर चालविण्यास घेईल त्यांना व्यायाम शाळेतील सामानाची देखभाल, व्यायाम शाळेची देखभाल करणे अभिप्रेत आहे. स्थानिक चौकशी केली असता, अशा व्यायामशाळेसाठी रू.२००/- प्रतिमहिना / प्रतिव्यक्ती इतके शुल्क संबंधीत संस्थेस मिळु शकते अशा लाभार्थीची संख्या (महिला व्यायामशाळा असल्याने) सुरूवातीस ३० पेक्षा अधिक असण्याची शक्यता कमी आहे.

दुरूस्ती देखभाल खर्च / लाभार्थीची संख्या, मुळातील प्रस्ताव हाच सुविधा पुरविणे बाबत असल्याने ही वस्तुस्थिती विचारात घेता संबंधीत संस्थेकडून रू.२०००/- प्रतिमहिना व डिपॉसिट रू.१०,०००/- इतके घेणे योग्य होईल. सबब हा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सादर करणे योग्य होईल. दि.२५/६/२०१०

मा.उपायुक्त (कर) साहेब :- नगररचनाकार यांचे अभिप्रायनुसार सदरची जीम संचालनासाठी भाडेतत्वावर करार पध्दतीने देणे बाबतचा, भाडे निश्चिती बाबत धोरण ठरविणेसाठी स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे योग्य सबब आदेशार्थ सादर दि.३०/७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.३१/७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा

मा.सभापती साहेब :- राणी लक्ष्मीबाई चौक भुषणनगर केडगांव येथील महानगरपालिकेचा महिला जिम महिला बचत गटास अथवा संस्थेस भाडे तत्वावर चालविण्यांस देणेबाबत चे भाडेपट्टा करारनाम्याचे मसुदयास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- शहरामध्ये असलेले महानगरपालिकेचे मालकीचे जिम, व्यायाम शाळा भाडे तत्वावर चालविण्यांस दिलेल्या आहेत का ? तसेच सदरचा राणी लक्ष्मीबाई चौक भुषणनगर येथील जीम चालविणेस मिळणे बाबत कुणी मागणी केलेली आहे का ?

क्रीडा विभाग श्री. मिसाळ :- भाडे तत्वावर चालविण्यांस देणेबाबतचा हा पहिलाच जिम आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- चौपाटी कांरजा भागातील महानगरपालिकेचा एक जीम भाडे तत्वावर चालविण्यांस दिला आहे का ? माहिती सांगावी.

मा.सभापती साहेब :- क्रीडा विभाग प्रमुखांनी  माहिती सांगावी.

क्रीडा विभाग लिपीक श्री.मिसाळ एस.डी. :- मला जास्त माहिती नाही श्री.फिलीप्स माहिती देवू शकतील.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- श्री. मिसाळ यांना जास्त माहिती देता येणार नाही  क्रीडा विभागाचे श्री. फिलीप्स यांना सभेमध्ये बोलावण्यात यावे.

मा.श्री. पवार बा.रे. :- महानगरपालिका मालकीचे जीम भाडे तत्वावर चालविण्यास दिल्याची माहिती तसेच सदर जीम चालविण्यास मिळणे बाबत कुणी मागणी केली आहे का ? मागणी केली असल्यास त्या प्रमाणे प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी ठेवण्यात यावा.

मा.श्री. बास्कर पो.ज. :- माहितीसह प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी घेण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- केडगांव येथील सदरचा जीम भाडेतत्वावर चालविण्यास मिळणेबाबत कुणाची मागणी असल्यास तसेच महानगरपालिकेचे मालकी असलेले जीम / व्यायामशाळा भाडे तत्वावर चालविण्यांस दिले असले बाबतचे माहितीसह प्रस्ताव सर्वानुमते पुढील सभेमध्ये निर्णयासाठी ठेवण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे  राणी लक्ष्मीबाई चौक भूषणनगर केडगाव येथील जीम भाडे तत्वावर चालविण्यांस मिळणे बाबत मागणी असल्यास तसेच महानगरपालिकेचे मालकी असलेले जीम / व्यायामशाळा भाडे तत्वावर चालविण्यांस दिले असले बाबतचे माहितीसह प्रस्ताव पुढील सभेमध्ये निर्णयासाठी ठेवणेत यावा.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.    सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.    सही /-

ठराव सर्वानुमते  मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९**

विषय क्रमांक- ५७ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक -५७ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे औरंगाबाद रोड वरील मुख्य इमारतीवर नेटवर्क सुधारणा कामासाठी आय.बी.एस. सिस्टीम बसविणेस परवानगी मिळणेबाबत एअरटेल अभ्युदय टेलीकॉम यांचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** नगररचना विभाग अ.नगर म.न.पा. दि.२६/७/२०१०

सादर,

**विषय**- नेटवर्क सुधारणा कामासाठी (I.B.S.) परवानगी मिळणे बाबत.

**संदर्भ** :- एअरटेल अभ्युदय टेली कॉम यांचे पत्र प्राप्त दि.२३/७/२०१०

उपरोक्त विषयान्वये विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, मोबाईल नेटवर्क सुधारणा करणेसाठी अहमदनगर म.न.पाच्या औरंगाबाद रोड वरील मुख्य इमारतीवर I.B.S. सिस्टीम बसविणे बाबत संदर्भिय पत्र दिलेले आहे व सोबत माहिती पत्रक व नकाशा जोडलेला आहे.

सोबत जोडलेला नकाशा सर्वसाधारण पणे ठिक आहे व त्यानुसार I.B.S. सिस्टीम इमारतीवर बसविणेस हरकत नाही असे मत आहे. तरी मान्यतेसाठी सादर.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे. दि. २६/०७/२०१०

मा.उपायुक्त (सा.)साहेब :- Pl. Discuss दि.२७/७/२०१०

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- चर्चा झाली जागा वापर शुल्काबाबत सादर करा.

नगररचनाकार :- सादर, विषयांकित एअरटेल या कंपनीनी महानगरपालिकेच्या इमारतीच्या टेरेसवर सुमारे वीस चौ.मी. जागेची आवशक्यता लागणार आहे. ही जागा संबंधीत संस्थेस रूपये २००/- प्रति चौ.मी. प्रतिमहिना या दराने भाडे आकारून देणे योग्य होईल. याप्रमाणे या जागेसाठी कंपनीकडून वार्षिक भाडे घेणे योग्य होईल. हे भाडे रूपये पन्नास हजार इतके घेणे योग्य आहे. (प्रतिवर्ष)ही रक्कम कंपनीकडून आगाउत्र स्वरूपात घेणे योग्य होईल.

उपरोक्त भाडे दरास मा.स्थायी समितीची मंजुरी आवशक्य आहे. या मंजुरीनंतर किंवा तश्या प्रकारचे प्रतिज्ञा पत्र कंपनीकडून घेवुन सदर कंपनीस विषयाकिंत काम सुरू करण्यास परवानगी देणे योग्य होईल. दि.३०/७/२०१०

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- शहर अभियंता अभिप्रायासह सादर करा. दि.३०/७/२०१०

शहर अभियंता :- श्री. नामदे सदर कामासाठी त्वरीत अहवाल देणे. दि.३०/७/२०१०

कनिष्ठ अभियंता :- मा.सादर, अहमदनगर महानगरपालिकेने अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता एअरटेल मोबाईल सेवा सुरू करण्यात आली आहे. सदर सेवेस महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत नेटवर्क कवरेज मिळत नसल्याने कामकाजांत अडचणी निर्माण होत आहे. सदर अडचणी दूर करणेच्या दृष्टीने एअरटेल कंपनीमार्फत मुख्य इमारतीमध्ये IBS पोल बसविणे बाबत आपले कडून मागणी झाली आहे. त्यानुसार संबंधीत कंपनी यांनी IBS पोल उभारणी करता साहित्य मागणी करणेकरीता महापालिकेकडे परवानगी मागीतली आहे. तरी सदर IBS पोल बसविल्यास मोबाईल कवरेज व्यवस्थीत होईल. व कामकाजाच्या दृष्टीने योग्य राहिल तरी सदर कंपनीस IBS पोल मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये बसविणेस परवानगी देणेच्या आदेशार्थ सादर.

मा.शहर अभियंता:- मा.नगररचनाकार यांचे कडील अभिप्रायानुसार व सदर IBS सिस्टीम बसविणे आवश्यक असल्याने संबंधीत कंपनीकडून नियमानुसार भाडे व डिपॉसिट घेवुन काम करणेस मंजुरी देणे योग्य तथापी सदरचा विषय मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य दि.३०/७/२०१०

अंतर्गत लेखा परिक्षक :- मुख्य इमारतीवर आय.बी.एस. सिस्टीम बसवून याकरीता एअर टेल कं.कडून प्रतिवर्षी रू.५०,०००/- घेणेबाबतचा विषय चर्चेकरीता स्थायी समितीपुढे ठेवणेत यावा. मान्यतेसाठी दि.३०/७/२०१०

मुख्य लेखा अधिकारी :- रू.५०,०००/- आगावू रक्कम जमा करण्यांत येवुन मुख्य इमारतीवर IBS System बसविणेस मंजूरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे ठेवणे योग्य. दि.३०/७/२०१०/**अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- उपरोक्त **"अ"** प्रस्तावीतनुसार IBS System बसविणेबाबत Airtel कंपनीस परवानगी देणेस व ५ वर्षाचा करारनामा करणेस हरकत नसावी. सदरचा विषय मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणेच्या मान्यतेस्तव सादर. दि. ३०/०७/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ३०/०७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- आपले महानगरपालिकेचे मुख्य इमारतीवर नेटवर्क सुधारणा कामासाठी आय.बी.एस.सिस्टीम बसविणेस एअरटेल अभ्युदय टेलीकॉम यांना परवानगी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- आय.बी.एस. सिस्टीम कशासाठी बसविणे आहे.

सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- आपले कडेस पूर्वी बी.एस.एन.एल.चे मोबाईल फोनची सेवा होती आता एअरटेल कंपनीची सेवा आपण घेतलेली असून त्यांना फोनचे रेंज साठी इमारतीवर आय.बी.एस.सिस्टीम बसवायची आहे. त्याकरिता त्यांना मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

प्र.नगरसचिव श्री.पवळे एन.एम. :- सदर संस्थेकडून डिपॉसिट म्हणून रूपये पन्नास हजार घेवुन वीस चौरस मीटर इमारतीचे टेरेस वरील जागा दरमहा रूपये दोनशे प्रती चौरस मीटर याप्रमाणे भाडे आकारणी करून आय.बी.एस. सिस्टीम उभारणे करिता देणे आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- एका मोबाईल टॉवरचे भाडे दरमहा रूपये पंधरा हजारापर्यत घेतात हे भाडे कमी आहे.

सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख साहेब :- कंपनी आपले इमारतीवर मोबाईल टॉवर उभारणार नसून फक्त आय.बी.एस. सिस्टीम पोल बसविणार आहेत.

मा.श्री. पवार बा.रे. व मा.श्री. बारस्कर पो.ज. :- कंपनीच्या अधिका-यास सभेमध्यें बोलावून घ्यावे ते सदर बाबतीत जास्त माहिती देतील.

मा.सभापती साहेब :- शहर अभियंता यांनी माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- मोबाईल नेटवर्क सुधारणा करणेसाठी महानगरपालिकेचे औरंगाबाद रोड वरील मुख्य इमारतीवर आय.बी.एस. सिस्टीम बसविणेबाबत एअरटेल अभ्युदय टेलीकॉम यांचे पत्र आहे. सदरची आय.बी. एस. सिस्टीम बसविणेस हरकत नाही. अशाबाबत नगररचनाकार यांचा अहवाल असून मा.उपायुक्त साहेब यांचे "चर्चा करा" या शे-यानुसार चर्चा झाले नंतर नगररचनाकार यांनी फेर रिपोर्ट सादर केलेला असून सदर कंपनीस महानगरपालिकेचे इमारतीचे टेरेस वरील वीस चौरस मीटर जागेची आवश्यक्ता लागणार असून ही जागा संबंधीत संस्थेस रूपये २००/- प्रती चौरस मीटर प्रतीमहिना या दराने भाडे आकारणी करून रूपये ५०,०००/- फक्त आगाउ स्वरूपात घेवुन परवानगी देणे योग्य होईल अशाबाबत मा. नगररचनाकार यांचा अहवाल आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सदर कंपनीकडून भाडे वाढवून घेण्यात यावे. तसेच सदर कंपनीचे मोबाईल सेवा महानगरपालिकेने बंद केल्यास सदर सिस्टीम त्यांनी काढून घ्यावी. अशी अट टाकण्यांत यावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- सदर कंपनीकडून डिपॉसिट वाढवून घेण्यांत यावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- डिपॉसिट रूपये पंच्याहत्तर हजार व दरमहा भाडे रूपये दोनशे प्रती चौरस मीटर घेवुन वीस चौरस मीटर जागा आय.बी.एस.सिस्टीम बसविणे करिता सदर कंपनीस देणेस मंजूरी देण्यांत यावी. तसेच सदर कंपनीकडून पुढील वर्षापासून दहा टक्के भाडेवाढ करून भाडे आकारणी करावी.

मा.श्री. पवार बा.रे. :- मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे सदर कंपनी कडून रूपये दोनशे प्रती चौरस मीटर याप्रमाणे दरमहा भाडे आकारणी करून रूपये पंच्याहत्तर हजार डिपॉझिट रक्कम घेवुन वीस चौरस मीटर जागा आय.बी.एस. सिस्टीम बसविणेकरिता भाडे कराराने देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. तसेच सदर कंपनीकडून पुढील वर्षापासून दरवर्षी दहा टक्के भाडे वाढवून घेण्यांत यावे. तसेच सदर कंपनीची मोबाईल सेवा बंद केल्यानंतर कंपनीने सदरची सिस्टीम त्वरीत काढून घ्यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे औरंगाबाद रोड वरील मुख्य इमारतीवर नेटवर्क सुधारणा कामासाठी एअरटेल अभ्युदय टेलीकॉम यांना इमारतीचे टेरेस वरील २० चौरस मीटर जागा दरमहा भाडे रूपये २००/-(रूपये दोनशे फक्त) प्रती चौरस मीटर व अनामत रक्कम रूपये ७५,०००/- (रूपये पंच्याहत्तर हजार फक्त) घेवुन आय.बी.एस. सिस्टीम बसविणे करिता भाडे कराराने देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

तसेच सदर कंपनीकडून पुढील वर्षापासून दरवर्षी दहा टक्के (१०%)भाडे वाढवून घेण्यांत यावे. सदर कंपनीची मोबाईल सेवा बंद केल्यानंतर कंपनीने सदरची सिस्टीम त्वरीत काढून घ्यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९**

विषय क्रमांक-५८ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक -५८ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. श्रीकृष्ण रेवजी पवार, रा. बायजाबाई सोसायटी घर नं.११० अ १ यांचे घरास नळ कनेक्शन घेतलेले नसतांना त्यांना देण्यात आलेले सन २००४-२०१० अखेर (वॉर्ड क्र.६१ बील क्रमांक ५११) पाणीपट्टी रूपये १६,४७६/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सावेडी उपविभाग जा.क्र. दिनांक

सादर,

सावेडी प्रभाग समिती क्र.१ वसुली विभाग वॉर्ड क्र.६१ चे वसुली लिपीक यांजकडुन विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, वॉर्ड नं.६१ मधील मालमत्ताधारक श्री. श्रीकृष्ण रेवजी पवार रा. बायजाबाई सोसायटी घ.नं. ११० अ १ बिल नं.५११ दि.२५/२/२०१० अन्वये अर्ज देवुन कळविले आहे कि मी कनेक्शन घेतलेले नाही. मला बिल नं.५११ नुसार दरवर्षी सन २००४ ते २०१० अखेर बील रूपये १६४७६/- आले आहे. हे आपण पाहणी करून नळ सत्यते बाबत खात्री करून माझ्याकडे दाखविण्यात आलेली पाणीपट्टी रद्द करण्यांस विनंती आहे. तरी माझ्या अर्जाची योग्य दखल घ्यावी अशी विनंती केलेली आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार दि.९/३/२०१० रोजी पाणी पुरवठा विभाग प्रभाग समिती क्र.१ नळ कनेक्शन आहे किंवा नाही कसे याबाबत मनपा फिटर व वसुली लिपीक यांनी प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी केली असता सदर मिळकत धारकाकडे बिल नं.५११ व बिल नं.५१२ वर १ नळ कनेक्शन चालु आहे. परंतु मिळकत नं.५११ वर नळ कनेक्शन नाही असे आढळून आले आहे. तरी अर्जदार यांचे अर्ज व मनपा फिटर व वसुली क्लार्क यांनी समक्ष जागा स्थळपाहणी रिपोर्ट वरून नळ कनेक्शन नसलेबाबतचे अभिप्रायानुसार पाणीपट्टी बिल १६४७६/- सन २००४-२०१० अखेरपर्यतचे रद्द करणेस संगणक विभागाकडे रक्कम कमी करणेस अहवाल आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे हेडवसुली सावेडी वसुली विभाग यांचा अहवाल असे.

सहा.आयुक्त श्री. आर.ए.देशमुख साहेब :- सादर, तक्रार अर्जाप्रमाणे दि.९/३/१० रोजी स्थळ पाहणी करून फिटरचा रिपोर्ट घेण्यांत आला असुन सदर मिळकतीस नळ कनेक्शन नाही. परंतु टाचण रजिष्टर व डिमांड रजिष्टरला नोंद असल्यामुळे पाणीपट्टी सन १० अखेर रू. १६४७६/- आकारण्यांत आलेली आहे. सदर मिळकत धारक यांनी दि.४/९/२००४ रोजी अर्ज दिलेला आहे. नळ कनेक्शन नसल्याने केलेली आकारणी कमी करणे योग्य होईल सबब आदेशार्थ. /**अ**

मुख्यलेखा परिक्षक/मुख्यलेखाअधिकारी:- **"अ"** मान्य करून कर आकारणी कमी करावी. दि.७/७/२०१०/**अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** प्रस्तावीतनुसार सदरची आकारणी कमी करणेस हरकत नाही. सदरची सन मार्च २०१० अखेरची थकबाकी निर्लेखित करणेबाबत मुं.प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ पाठविणे योग्य. दि. ०७/०८/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.७/८/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- घरास नळ कनेक्शन घेतलेले नसतांना देण्यांत आलेल्या बीलची रक्कम निर्लेखित करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- यापुर्वी अशा प्रकारचे प्रस्ताव सभे पुढे सादर करण्यांत आले होते. त्यावेळी चुकीची पाणपट्टी आकारणी करणारे कर्मचा-यावर कारवाई करणे विषयी मा.स्थायी समितीने ठराव पारित केला होता. त्यानुसार केलेल्या कारवाईची माहिती द्यावी.

आस्थापना प्रमुख श्री. साबळे :- श्री. दिवाण, श्री. बुचकुल व इतर कर्मचारी यांचेवर कारवाई प्रस्तावीत केलेली आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- महानगरपालिकेने एजन्सी मार्फत महानगरपालिका हद्दीतील बोगस नळ कनेक्शनचा सर्वे पुर्वी केला होता तेव्हा ज्यांना घरपट्टी आहे त्यांना नळ कनेक्शन असल्याचे दर्शविल्यामुळे चुकीने पाणीपट्टी आकारणी केलेली असल्याची बरीच प्रकरणे आहेत.विना परवाना नळ कनेक्शनची पहाणी करावी त्यास प्रसिध्दी द्यावी.

मा.सभापती साहेब :- अशाप्रकारे पाणीपट्टी निर्लेखित करणे बाबत चे सर्व प्रस्ताव एकाच वेळी मा.स्थायी समिती मध्ये निर्णयासाठी महानगरपालिकेचे चारही प्रभाग अधिकारी यांनी सादर करावेत.

मा.श्री. पवार द.ज. :- प्रस्ताव क्रमांक ५८ व ५९ चे ऑफिस रिपोर्टास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्ताव क्रमाक ५८ व ५९ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करावेत. तसेच चुकीची पाणीपट्टी आकारणी करणारे संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्रमांक ५८ व ५९ चे ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावेत. तसेच चुकीची पाणीपट्टी आकारणी करणारे संबंधीत कर्मचा-यावर कारवाई करण्यांत यावी.

**ठराव :-** अर्जदार श्री. श्रीकृष्ण रेवजी पवार,रा.बायजाबाई सोसायटी घर नं.११० अ १ यांचे घरास नळ कनेक्शन घेतलेले नसतांना त्यांना देण्यात आलेले सन २००४-२०१० अखेर (वॉर्ड क्र.६१ बील क्रमांक ५११)पाणीपट्टी रूपये १६,४७६/- (रूपये सोळा हजार चारशे शहात्तर फक्त)चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट.

तसेच सदरची चुकीची पाणीपट्टी आकारणी करणारे संबंधीत कर्मचा-यांवर कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९**

विषय क्रमांक-५९ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक -५९ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. श्रीकृष्ण रेवजी पवार व श्री. बाळासाहेब पवार , रा. बायजाबाई सोसायटी प्लॉट नं.१३५ यांचे मोकळया भुखंडावर नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००३-२०१० अखेर ( वॉर्ड क्र.६१ बील क्रमांक ५९६) पाणीपटटी रूपये ६,०००/- चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सावेडी वसुली विभाग जा.नं. दिनांक

सादर,

सावेडी प्रभाग सिमती क्र.१ वसुली विभाग वॉर्ड क्र.६१ वसुली लिपीक पठाण एम.एन. , यांजकडून विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, वॉर्ड नं.६१ मधील मालमत्ताधारक बील क्रमांक ५९६ श्री. पवार श्रीकृष्ण रेवजी व श्री. बाळासाहेब पवार रा. बायजाबाई सोसा. प्लॉट नं.१३५ यांनी दि.१३/४/२०१० अन्वये अर्ज देवुन कळविले आहे की, ओपन प्लॉटवर कनेक्शन घेतलेले नाही तरी पण मला सन २००३-२०१० अखेर बिल रू.६०००/- आले आहे. आपण प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करून माझा प्लॉट सध्या रिकामा आहे. त्याठिकाणी काहीही नाही तरी खात्री करून माझ्याकडे दाखवण्यात आलेली पाणीपट्टी रद्द करावी असे कळविले आहे.

अर्जदार यांचे अर्जानुसार पाणीपुरवठा प्रभाग समिती क्र.१ नळ कनेक्शन आहे किंवा नाही कसे याबाबत मनपा फिटर यांचा दि.३/५/२०१० रोजीचा अभिप्राय सदर ठिकाणी ओपन प्लॉट आहे तेथे कोणतेही घर नाही तसेच सदर ठिकाणी नळ कनेक्शन नाही अर्जदार यांचे अर्ज म.न.पा. फिटर व वसुली लिपीक समक्ष जागा स्थळ पाहणी रिपोर्ट वरून सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याचे अभिप्रायानुसार पाणीपट्टी बिल रू. ६०००/- सन २००३ ते २०१० अखेरपर्यंतचे रद्द करणेस संगणक विभागाकडे रक्कम कमी करण्यास पुढील आदेशार्थ अहवाल सादर.

येणे प्रमाणे सावेडी हेडवसुली यांचा अहवाल असे.

सहा.आयुक्त श्री. आर.ए. देशमुख :- सादर, प्रस्तावाप्रमाणे सदर मिळकत ही ओपन प्लॉट असुन सदर मिळकतीस नळ कनेक्शन नाही सन ०६-०७ मध्ये संगणकावर नोंद घेताना चुकीने नोंद घेतल्याचे दिसुन येते. तरी सदर मिळकतीस नळ कनेक्शन नसल्याने चुकीने केलेली आकारणी रद्द करून संगणक व टाचण / डिमांड रजिष्टर ला नोंद करणे योग्य होईल सबब आदेशार्थ. दि. २२/६/१० **/अ**

मुख्य लेखा परिक्षक :- **"अ"** मान्य करून कर आकारणी कमी करावी. दि. ७/७/२०१०/**अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** नुसार आकारणी कमी करणे योग्य रक्कम निर्लेखित बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य. दि.०२/०८/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ७/८/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**ठराव :-** अर्जदार श्री. श्रीकृष्ण रेवजी पवार व श्री. बाळासाहेब पवार , रा. बायजाबाई सोसायटी प्लॉट नं.१३५ यांचे मोकळया भुखंडावर नळ कनेक्शन नसतांना त्यांना देण्यांत आलेले सन २००३-२०१० अखेर ( वॉर्ड क्र.६१ बील क्रमांक ५९६) पाणीपटटी रूपये ६,०००/- (रूपये सहा हजार फक्त)चे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट.

तसेच सदरची चुकीची पाणीपट्टी आकारणी करणारे संबंधीत कर्मचा-यांवर कारवाई करण्यांत यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री.पवार दगडू जयवंत. सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९**

विषय क्रमांक-६० सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक - ६० सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत गणपती देवस्थान माळीवाडा परिसराचे सुशोभिकरण करणेचे कामास,अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ९०,८३,७६९/-चे खर्चास मंजूरी देवुन सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष नियोजन समिती यांचेकडेस पाठविणेस मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. सार्व.बांधकाम विभाग दि. २/८/२०१०

विषय- तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

संदर्भ :- जिनिस/ तिर्थक्षे/१०-११/संस-४/१०१८ दि.१४/५/१०

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेस तिर्थक्षेत्र विकास योजना अंतर्गत संदर्भिय पत्रान्वये नमुद केल्याप्रमाणे गणपती देवस्थान माळीवाडा परिसराचे सुशोभिकरणाचे अंदाजपत्रक रक्कम रू.९०,८३,७६९/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी मंजूर रक्कम रू.७०.६४लक्ष असुन १२.५०% महानगरपालिका हिस्सा (रू.८.८३ लक्ष) व १२.५०% ट्रस्ट हिस्सा (रू.८.८३ लक्ष) असे एकुण रू.८८.३० लक्ष खर्च करणे अपेक्षित आहे.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.९०,८३,७६९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन गणपती देवस्थान ट्रस्ट यांना जा.क्र. सा.बां.वि. ७८६ दि.२९/७/१० अन्वये १२.५०% ट्रस्ट हिस्सा (रू. ८.८३ लक्ष) जमा करणेबाबत कळविण्यांत आले आहे.

तरी सदरचे अंदाजपत्रक मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविणे करिता आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

मा.उपशहर अभियंता :- संदर्भिय पत्रानुसार तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत माळीवाडा गणपती देवस्थान परिसर सुशोभिकरणाचा प्रस्ताव रू.९०,८३,७६९/- चा मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती,अ.नगर यांचेकडेस पाठविणे योग्य वाटते आदेशार्थ सादर. दि.२/८/१०

मा.शहरअभियंता:-मा.नगररचनाकार सदर कामाबाबत कृ.आपला अभिप्राय दयावा ही विनंती. दि.३/८/१०

नगररचनाकार :- विषयांकित प्रस्ताव मंजुर विकास योजनेतील वि.यो. रस्त्यांशी सुरूंगत आहे. वि.यो. रस्ते म.न.पा.च्या ताब्यात असुन विद्यमान आहेत.

सबब वरील प्रस्तावाप्रमाणे काम करण्यांस नगररचना विभागाची हरकत नाही. दि. ५/८/१०

शहर अभियंता :- मा. नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार व प्रस्तावाप्रमाणे रक्कम रू. ९०,८३,७६९/- चे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे योग्य. तथापी खर्चास मंजुरीसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सादर करणे योग्य दि. ५/८/१०

अंतर्गतलेखापरिक्षक / मुख्यलेखाअधिकारी :- गणपती देवस्थान माळीवाडा परिसर सुशोभिकरण करणे खर्च रू.९०,८३,७३९/- चे अंदाजपत्रकीय खर्चास मंजूरी देवुन मा. जिल्हाधिकारी यांचे कडे प्रस्ताव पाठविणेबाबतचा विषय मा.स्थायी समिती पुढे चर्चेसाठी ठेवणेस यावा. दि.९/८/१० /**अ**

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** प्रस्तावीतनुसार मान्य करणेस हरकत नाही. दि.०९/०८/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.०९/०८/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :-अहमदनगर महानगरपालिकेचे तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत गणपती देवस्थान माळीवाडा परिसराचे सुशोभिकरण करणेचे कामास व खर्चास मंजूर देवुन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष नियोजन समिती यांचेकडेस पाठविणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे. प्रस्तावाची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. **व** उपशहर अभियंता श्री.सातपुते आर.जी. :- अहमदनगर महानगरपालिकेस तिर्थक्षेत्र विकास योजना अंतर्गत निधी मंजूर झालेला असून गणपती देवस्थान माळीवाडा परिसराचे सुशोभिकरणाचे रक्कम रूपये ९०,८३,७६९/- चे अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून सदर कामासाठी मंजूर रक्कम रूपये ७०.६४ लक्ष व महानगरपालिकेचा १२.५०% प्रमाणे हिस्सा रूपये ८.८३ लक्ष व १२.५०% प्रमाणे ट्रस्ट हिस्सा रूपये ८.८३ लक्ष अशी एकूण रूपये ८८.३० रक्कम खर्च करणे आहे. सदर कामाचे रक्कम रूपये ९०,८३,७६९/- चे अंदाजपत्रकास मा.सभेने मंजूरी दिले नंतर सदरचे अंदाजपत्रक मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविणे आहे. परंतु मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांचेकडील मिटींगमध्ये झालेल्या चर्चेनुसार.

| अ.नं. | कामाचा तपशील | अंदाज पत्रकीय रक्कम रुपये | शासन देय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | माळीवाडा विशाल गणपती मंदीर परिसरात प्रकाश व्यवस्था करणे | ९,८९,७४४/- | ६.९० |
| २ | अहमदनगर बसस्थानक ते माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिर पोच रस्ता तयार करणे | ८४,९८,०००/- | ६३.७४ |
| | एकुण | ९४,८७,७४४/- | ७०.६४ |

या सुधारीत अंदाजपत्रकाचे रक्कमेप्रमाणे ट्रस्ट व महानगरपालिकेचा हिस्सा १२.५ % प्रमाणे संबंधिता कडुन वसुल करणेस व एकुण रक्कम रुपये ९४,८७,७४४/- चे अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस विनंती आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. **व** मा.श्री. पवार बा.रे. :- सदरचे माळीवाडा गणपती देवस्थान सुशोभिकरणाचे कामामध्ये कोण कोणती कामे करणेत येणार आहेत.

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- सदर गणपती देवस्थान माळीवाडा,परिसराचे सुशोभिकरणा अंतर्गत, विदयुती करण, फुटपाथ, पेव्हींग तसेच आमन पाटील रोड व पंचपीर चावडी रोड चे डांबरीकरण इत्यादी कामे करणेत येणार आहेत.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- यामध्ये वाडियापार्क एस.टी. स्टॅण्ड रोडचे डांबरीकरणाचे काम करणेत येणार का ?

शहर अभियंता श्री. मगर एन.बी. :- नाही या रस्त्याची कामे करण्यांत आलेली आहेत.तेथे काही भागात फुटपाथची कामे करणेत येणार आहेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- सुधारीत अंदाजपत्रकानुसार प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- सुधारीत अंदाजपत्रकानुसार प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत गणपती देवस्थान माळीवाडा परिसराचे सुशोभिकरण करणेकामी

| अ.नं. | कामाचा तपशील | अंदाज पत्रकीय रक्कम रुपये | शासन देय रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | माळीवाडा विशाल गणपती मंदीर परिसरात प्रकाश व्यवस्था करणे | ९,८९,७४४/- | ६.९० |
| २ | अहमदनगर बसस्थानक ते माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिर पोच रस्ता तयार करणे | ८४,९८,०००/- | ६३.७४ |
| | एकुण | ९४,८७,७४४/- | ७०.६४ |

या सुधारीत अंदाजपत्रकाचे रक्कमेप्रमाणे ट्रस्ट व महानगरपालिकेचा १२.५ % प्रमाणे हिस्सा संबंधितांकडून वसुल करणेस व रक्कम रुपये ९४,८७,७४४/- (रक्कम रुपये चौ-यान्नव लाख सत्त्याऐंशी हजार सातशे चव्वेचाळीस फक्त) चे खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.

तसेच सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष नियोजन समिती यांचेकडेस मान्यतेसाठी पाठविणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९

विषय क्रमांक-६१ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक -६१ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता भुल तज्ञांची पॅनलशिपवर दिनांक ०६/०७/२०१० ते दिनांक ०५/०१/२०११ अखेर सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रूपये ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २००/- याप्रमाणेचे मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जा.क्र. ४३/आस्थापना विभाग दि. ११/८/१०

विषय- भुल तज्ञांची पॅनलशिपवर नेमणुक करणेबाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी, यांनी रिपोर्ट देवुन कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करीता वैद्यकीय अधिकारी बधिरिकरण तज्ञांची आवश्यकता असते. भुल तज्ञांचे पद आस्थापना सुचिवर नाही. त्या करीता मा.स्थायी समिती ठराव नं.११४ दि.३१/३/१० अन्वये दि. ५/१/१० ते ४/७/२०१० अखेर प्रत्येकी मेजर ऑपरेशन करीता रू.४००/- व प्रत्येकी मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- प्रमाणे इच्छुक वैद्यकिय अधिकारी बधिरिकरण तज्ञांची पॅनलशिपवर मानधनावर नेमणुक करण्यात आलेली असुन सदरची मुदत दि.४/७/२०१० रोजी संपत आहे.

कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृहामध्ये प्रामुख्याने गरीब व मध्यम वर्गातील रूग्ण औषधोपचार व प्रसुति करीता येतात. त्यामुळे भुलतज्ञा अभावी ऑपरेशन करीता खाजगीरित्या भुलतज्ञाना कॉल केल्यास त्यांची भुल दिल्याबद्दलची फी रूग्णांना परवडणारी नसते. त्यामुळे रूग्णांची व पर्यायी हॉस्पीटलची गैरसोय होईल. तसेच हॉस्पीटलच्या दृष्टीने इर्मजन्सीच्या वेळी रूग्ण भुलतज्ञा अभावी दाखल करून घेणे धोक्याचे होईल व त्यामुळे हॉस्पीटल मध्ये दाखल होणा-या रूग्णांच्या संखेवर परिणाम होण्याची दाट शक्यता लक्षात घेता हॉस्पीटल व रूग्णांच्या दृष्टीने भुलतज्ञांची पॅनलशिपवर नेमणुक करणे गरजेचे आहे.

तसेच दवाखान्यात दरमहा साधाणत: ५०ते ६० मेजर ऑपरेशन व ३० ते ४० मायनर ऑपरेशन करीता भुलतज्ञांची आवश्यकता असते. सद्या भुल दिल्या बद्दल महानगरपालिका दि.१/४/२०००पासुन १] जनरल ॲनस्थेशिया (ऑपरेशन टयुबेकटोमी व्यतरीक्त)रू.१००/-२] लोकल ॲनस्थेशिया रू.३०/- प्रत्येक ऑपरेशन करीता फि म्हणुन वसुल केली जाते.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५४अन्वये दिनांक ६/७/२०१०ते५/१/२०११ अखेर सहामहिन्याकरीता पॅनलशिपवर प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रू.४००/- व मायनर ऑपरेशन करीता रू.२००/- प्रमाणे शहरातील इच्छुक भुल तज्ञांची नेमणुक करणे बाबत विनंती केलेली होती.

मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ मध्ये कलम ५३(१) अन्वये कारवाई करणे बाबत नमुद केले असुन सहा महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणुकी बाबत कलम ५३(१) मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणुकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे.

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिके मध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमुणका सहामहिन्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणी उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

२.पोटकलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणा खालील नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या आधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतरिक्त नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणुकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधी साठी करता येणार नाही. आणी भत्ते वगळुन शंभर रूपयाहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिका सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठी रक्तपेढी वैद्यकीय अधिकारी, व तंत्रज्ञान यांच्यासाठी रू.५,००,०००/- (अक्षरी रूपये पाच लाख) ची तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथील येणा-या रूग्णांची निकड लक्षात घेता व मा.मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांचे प्रस्तावाप्रमाणे सोबत जोडलेल्या मागील आदेशातील इच्छुक भुल तज्ञांची तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रू. ४००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन रू. २००/- मानधनावर दि.६/७/२०१० ते ५/१/२०११ अखेर सहा महिन्या करीता तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक होण्याबाबत आदेशार्थ सादर. /**अ**

येणेप्रमाणे आस्थापना लिपिक यांचा अहवाल असे.

मा.आस्थापना प्रमुख :- **"अ"** प्रमाणे मान्यतेस्तव आदेशार्थ सादर. दि.१७/७/१०

मा. सा.प्र.वि. प्रमुख :- **"अ"** प्रमाणे मान्येतस्तव सादर दि.२२/७/१०

मा.उपायुक्त (कर) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत मा.स्थायी समितीसमोर निर्णयार्थ ठेवणे योग्य. दि.१०/८/२०१०

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१०/८/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै. बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता मानधनावर भुल तज्ञांच्या नेमणूका करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करिता भुल तज्ञांची पॅनलशिपवर दिनांक ०६/०७/२०१० ते दिनांक ०५/०१/२०११ अखेर सहा महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरूपात प्रत्येक मेजर ऑपरेशन साठी रूपये ४००/-(रूपये चारशे फक्त) व प्रत्येक मायनर ऑपरेशनसाठी रूपये २००/-(रूपये दोनशे फक्त ) याप्रमाणेचे मानधनावर नेमणूका करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक ०९**

विषय क्रमांक-६२ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

ठराव क्रमांक -६२ सोमवार दिनांक ३०/८/२०१०

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये सन २०१०-२०११ या कालावधीत आयात होणा-या जकात पात्र मालावर महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत अथवा जकात अभिकर्तामार्फत पुढिल एक महिन्याचे कालावधीस्तव मुदतवाढ देवुन जकात वसुली करणे तसेच जकात ठेक्याची ठरविलेल्या देकार रकमे बाबत प्राप्त पत्रा विषयी ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. जकात विभाग दि. २१/८/२०१०

सविनय सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१०-११ करीता जकात वसुलीसाठी जकात अभिकर्ता नेमण्यास मा.स्थायी समिती ठराव क्र. २७ दि.२३/६/२०१० अन्वये देकार रक्कम रू.५८,०५,०९,४९४/- निश्चित करून स्थानिक, राज्यस्तरीय तसेच जिल्हास्तरीय वर्तमान पत्रातुन अनुक्रमे दि.२५/६/२०१० आणि दि.८/७/२०१० रोजी अश दोन वेळेस जाहिर निविदा सुचना प्रसिध्द केलेल्या आहेत.

सदर जाहिर सुचनेत प्रसिध्द केल्याप्रमाणे दि.२५/६/२०१० च्या पहिल्या निविदा सुचनेनुसार १) सहकार ग्लोबल प्रा. लि. मुंबई व २) एम.इ.पी.टोल रोड प्रा.लि. मुंबई यांचेमार्फत निविदा फार्म घेण्यात आले होते व त्यांनी नियमानुसार आवश्यक ती प्रत्येकी इसारा रक्कम रू. २,९०,२५,४७५/- महानगरपालिकेच्या कोषात भरलेली आहे, मात्र निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख ७/७/२०१० असताना सदर दिवशी एकही निविदा प्राप्त झालेली नाही,

पहिल्या जाहिर निविदा सुचनेनुसार एकही निविदा प्राप्त न झाल्याने महानगरपालिकेने दि.८/७/२०१० रोजी दुस-यांदा फेर निविदा प्रसिध्दीस दिलेली आहे, सदर निविदा सुचनेनुसार जकात अभिकर्ता नेमणुक प्रकरणी दि.१७/७/२०१० अखेर १) एस.एम.एस. इन्फ्रास्ट्रक्चर, नागपुर २) सहकार ग्लोबल प्रा.लि. मुंबई. अशी दोन निविदा फार्म ची विक्री झालेली आहे. व सदर निविदाकारांनी विहीत मुदतीत नियमानुसार प्रत्येकी आवश्यक ती इसारा रक्कम रू.२,९०,२५,४७५/- महानगरपालिकेकडे भरणा केलेली आहे, मात्र निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख १९/७/२०१० असताना सदर दिवशी देखील एकही निविदा प्राप्त झालेली नाही,

सन २०१०-११ या वर्षाकरीता जकातीस्तव अभिकर्ता नेमणुकीच्या उक्त प्रक्रियेबाबत मा.शेख आरिफ रफियोद्दीन-सभागृह नेते अहमदनगर महानगरपालिका यांनी अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१०-११ या वर्षात जकात वसुलीकरीता प्रसिध्दीस दिलेल्या दि.७/७/२०१० चे जाहीर निविदा सुचनेतील अट- जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी निविदा धारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव व एक वर्षात किमान ४० कोटी रकमेचा जकात / पथकर (टोल) वसुलीचा अनुभव असावा या अटीबाबत मे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविषयी दि.१९/७/२०१० रोजी जकात विभागाचे कार्यालयाकडेस यादी दिलेली असुन जाहीर निविदेबाबत शुध्दीपत्रक काढुन दुरूस्ती करावी, पथकर (टोल) वसुलीचा अनुभव असावा ही दिलेली अट वगळण्यात यावी व जकात अभिकर्ता यास किमान ४० कोटी रक्कमेच्या जकात वसुलीचा कमीत कमी एक वर्षाचा अनुभव असावा अशी अट टाकणे आवश्यक आहे असे वाटते अशा बाबत कळविले आहे.

त्यावर सदर यादीनुसार मा. शेख आरिफ रफियोद्दीन, सभागृह नेता यांना इकडील जकात / जा.क्र. ८१ दि.२/७/२०१० अन्वये सन २०१०-११ करीता जकात वसुली करीता जकात अभिकर्ता नेमणुक करण्याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.२७ दि.२३/६/२०१० अन्वये अट क्र. १) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकास पुर्वीचा किमान एक वर्षाचा अनुभव व एक वर्षात किमान ४० कोटी रकमेचा जकात / पथकर (टोल) वसुलीचा अनुभव असावा. याबाबत अटी शर्ती ठरविण्यात आल्या असल्याने उक्त अटी व शर्ती यामध्ये फेरबदल प्रशासकीय स्तरावर करता येणार नाही अशाबाबत पत्राने कळविण्यांत आलेले आहे,

महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नेमणुक प्रक्रियेत प्रसिध्द केलेल्या निविदा सुचनेतील अटी बाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं. २५८४ /२००८ व १३५/२००९ या रिट पिटीशन मध्ये त्यावेळचे मुख्य न्यायमुर्ती मा.स्वतंत्र कुमार व न्यायमुर्ती मा.डॉ. डी.वाय. चंद्रचुड यांनी त्यांच्या पुढील वरील रिट पिटीशन मध्ये पथकर वसुली व जकात वसुली याबाबत स्पष्ट आदेश दिलेले आहेत, त्याचप्रमाणे जकात अभिकर्ता म्हणुन जकात वसुलीचे काम करणे हे विशेष प्रकारचे काम असुन त्याकामासाठी टोल वसुलीचा अनुभव हा जकात वसुलीचा अनुभव आहे असे समजण्यात येणार नाही असे स्पष्ट आदेश दिलेले असल्याने प्रस्तुत अटी बाबत अ.नगर महानगरपालिकेचे लिगल रिटेनर ॲड.श्री.बाबर यांचेमार्फत कायदेशीर मत तथा अभिप्राय मागविण्यांत आलेले असुन सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा विचार करता जकात व टोल या दोन्ही गोष्टी वेगळया आहेत ज्याला जकात वसुलीचा अनुभव असेल त्याचाच विचार करणे कायदेशीररित्या उचित होईल अशाबाबत मा. लिगल रिटेनर यांनी कायदेशीर अभिप्राय दिलेले आहेत.

मा.शेख आरिफ रफियोद्दीन सभागृह नेते यांनी दिलेल्या उक्त यादीप्रमाणे मा.संजयजी गाडे,स्थायी समिती, सभापती अहमदनगर महानगरपालिका यांनी दि.१९/७/२०१०रोजी यादी दिलेली असुन उक्त अटीचे अनुषंगाने न्यायालयीन अडचण निर्माण होण्याची शक्यता असल्याने जकातीची तिसरी निविदा प्रसिध्द न करता सदरचा विषय तात्काळ मा.स्थायी समितीसमोर सादर करण्यांत यावा. महानगरपालिकेचे प्रमुख उत्पन्नाचे साधन असणा-या जकात वसुली बाबत करावयाच्या उपाय योजने विषयी निर्णय घेणे सुलभ होईल. तरी सदरचा विषय प्राधान्याने काल मर्यादेत मा. स्थायी समिती समोर सादर करण्याची दक्षता घ्यावी अशाबाबत कळविले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने सन २००९-१० या वर्षाकरीता मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड यांची जकात अभिकर्ता म्हणुन नेमणुक केलेली आहे, सदर जकात अभिकर्त्याची जकात वसुलीची कराराची मुदत दि.३१/७/२०१० रोजी संपते आहे, सन २०१०-११ या वर्षाकरीता जकात अभिकर्ता नेमणुक करणे कामी वरील प्रमाणे दोन वेळेस वर्तमान पत्रांतुन जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करून देखील एकही निविदा प्राप्त झालेली नसुन तिसरी जाहीर निविदा प्रसिध्द करण्यास नियमानुसार आवश्यक तो पुरेसा कालावधी शिल्लक राहीलेला नाही, मुदतीत जकात अभिकर्ताची नेमणुक न झाल्यास जकात अभिकर्त्याची नेमणुक होई पर्यत उक्त कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत जकात वसुल करणे भाग पडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने सन २०१०-११ या वर्षाकरीता जकात वसुलीस्तव जकात अभिकर्ता नेमणुकी बाबत योग्य तो धोरणात्मक निर्णय घेण्याविषयी मा.स्थायी समिती पुढे कार्यालयीन प्रस्ताव सादर करण्यांत आला असता.

मा.स्थायी समिती ठराव क्र.५३ दि. ३१/७/२०१० अन्वये पुढील प्रमाणे ठराव बहुमताने पारित करण्यांत आलेला आहे.

**<u>ठराव :-</u>** "अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या मालावर जकात वसुली कामी सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील बारा महिन्याकरिता जकात अभिकर्ता नेमणे कामी दुस-यांदा जाहिर निविदा प्रसिध्द करूनही एकही निविदा प्राप्त झालेली नसल्याने योग्य तो धोरणात्मक निर्णय ठरविणे बाबत. सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या जकात संकलन अभिककर्ता मे.सहकार एजन्सी प्रा.लि.मुंबई यांना दिनांक ०१/०८/२००९ ते ३१/०७/२०१० या कालावधीसाठी मंजूर केलेली एकूण देकार रक्कम व प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठीचे रक्कमेसहचे जकात वसुली दराचे प्रमाणात १महिन्याकरिता येणारी रक्कम रूपये ४,१२,१६,६६६/- (रूपये चार कोटी बारा लाख सोळा हजार सहाशे सहासष्ट फक्त) एवढी रक्कम निश्चित करून मे. सहकार एजन्सी प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०८/२०१० ते ३१/०८/२०१० या १ महिन्याचे कालावधीसाठी मागील अटी / शर्तीनुसार जकात वसुली करिता १ महिन्याची मुदतवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

महानगरपालिकेने जकात अभिकर्ता नेमणूकी साठी प्रसिध्द केलेल्या निविदा अटी / शर्ती मधील "निविदाकारास टोल वसुलीचा अनुभव असावा" ही अट रद्द करून फक्त जकात वसुलीचा अनुभव असणारे निविदा कारास जकात वसुली करिता नेमण्यात यावे. तसेच जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणूकीसाठी पुढील निविदा प्रक्रिया तात्काळ करण्यांत यावी. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.तथापी सदर सभेचे इतिवृत्त कायम होण्यांची वाट न पहाता सदर कामी तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी"

मा.स्थायी समिती ठराव क्र.५३ दि. ३१/७/२०१० अन्वये जकात अभिकर्ता यांना दि.१/८/२०१० ते ३१/८/२०१० या १ महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली असुन जा.क्र./जकात /१०८ दि.३१/७/२०१० अन्वये तिस-या वेळेस जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मात्र महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या निविद सुचनेनुसार निविदा दाखल करण्याचे अंतीम दिवशी देखील काहीही प्रतिसाद मिळालेला नसुन एक ही निविदा प्राप्त झालेली नाही.

अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१०-११ करीता जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुक प्रकरणी मा.स्थायीसमिती ठराव क्र.२७ दि.२३/६/२०१० अन्वये निश्चित केलेली देकार रक्कम रू.५८,०५,०९,४९४/- ही सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या ठेक्याच्या देकार रक्कमेच्या २१टक्के वाढीव असल्याने व वाढ ही महानगर पालिकेस प्राप्त देकार रक्कमेच्या म्हणजेच रक्कम रू.४८.०६कोटी यावर मा.शासनाच्या निर्देशानुसार १०% टक्के वाढ केल्यास निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होवु अशाबाबत मे.कोहीनुर इन्फ्रास्ट्रक्श्चर यांनी दि.११/८/२०१० रोजी तसेच दि.१२/८/२०१० रोजी मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्श्चर लि. यांनी पत्राद्वारे विनंती केलेली आहे.

तथापी अहमदनगर महानगरपालिकेने जा.क्र./जकात /११७ दि.१२/८/२०१० अन्वये चौथ्या वेळेस जाहिर निविदा सुचना प्रसिध्दीस दिलेली असुन सदर निविदा प्रक्रियेत सहभाग घेण्याकरीता पत्राद्वारे १) मे. कोणार्क इन्फ्रा. प्रा.लि. उल्हासनगर २) मे. साई एन्टरप्रायजेस, उल्हासनगर ३) मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. मालाड, मुंबई ४) मे. आयडीयल रोड बिल्डर्स प्रा.लि. अंधेरी, मुंबई आणि ५) मे. कोहीनुर इन्फ्रा. लि. उल्हासनगर यांना जकात जा.क्र./११८ दि.१६/८/२०१० अन्वये आवाहन करण्यात आलेले आहे.

मात्र निविदा सुचनेत प्रसिध्द केल्यानुसार दि.२१/८/२०१० रोजी निविदा दाखल करण्याचा अंतीम दिवस असताना देखील एकही निविदा प्राप्त झालेली नसुन निविदा सुचनेस काहीही प्रतिसाद मिळालेला नाही. अशा प्रकारे महानगरपालिकेने एकुण चार वेळेस वर्तमान पत्रांतुन जाहिर निविदा सुचना प्रसिध्द केलेल्या असुन सदर कामी जाहिराती करीता आजवर सुमारे रक्कम रू. १६ लाख इतका खर्च आलेला आहे.

मे. सहकार एजन्सीज प्रा.लि. जकात अभिकर्ता यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.५३ दि.३१/७/२०१० नुसार दि.१/८/२०१० ते ३१/८/२०१० अखेर या एक महिन्याचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली असुन दि.३१/८/२०१० रोजी सदर अभिकर्त्याचा जकात संकलनाचा कालावधी संपुष्टात येणार आहे.

तसेच जकात अभिकर्ता नेमणुक प्रक्रियेत फेर निविदा सुचना प्रसिध्द करण्यास नियमानुसार पुरेसा आवश्यक तो कालावधी शिल्लक राहीलेला नसल्याने दि.१/९/२०१० पासून जकात कराची वसुली ही महानगरपालिकेच्या कर्मचा-यांमार्फत करावी किंवा कसे ? अथवा मा. शासनाने जकात ठेका देण्याच्या संदर्भात दिलेल्या निर्देशानुसार मे. सहकार एजनीज प्रा.लि.जकात अभिकर्ता यांना पुढील एक महिन्याचे कालावधीकरीता मुदतवाढ देणेबाबतचा विषय उचित निर्णयास्तव मा.स्थायी समिती पुढे पाठविणे अत्यावश्यक आहे, तसेच महानगरपालिकेने जकात ठेक्याची ठरविलेली देकार रक्कम ही चुकीची असुन कमी करण्याबाबत प्राप्त पत्र अवलोकनार्थ पाठविणे उचित वाटते, तरी सदर बाबत पुढील योग्य ते आदेश व्हावेत ही विनंती.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे

मुख्यलेखापरिक्षक / मुख्यलेखाअधिकारी :- सदरचा विषय चर्चा व उचित निर्णय घेण्यासाठी स्थायी समितीपुढे ठेवणेत यावा. दि.२१/८/२०१० **/अ**

मा.उपायुक्त (सा./कर) साहेब :- **"अ"** नुसार सादर दि. २१/८/२००

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक २१/८/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- जकात वसुली महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत करणे किंवा सध्याचे ठेकेदारास १ महिन्याची मुदतवाढ देणे व आपण ठरविलेली देकार रक्कम बाबत आलेल्या पत्रावर निर्णय घेणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- देकार रक्कम चुकीची कशी आहे.

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री. सारसर :- अहमदनगर महानगरपालिकेने सन२०१०-११ करीता जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमणुक प्रकरणी मा.स्थायीसमिती ठराव क्र.२७ दि.२३/६/२०१० अन्वये निश्चित केलेली देकार रक्कम रू.५८,०५,०९,४९४/- ही सन २००९-१० या आर्थिक वर्षाच्या ठेक्याच्या देकार रक्कमेच्या २१टक्के वाढीव असल्याने व वाढ ही महानगर पालिकेस प्राप्त देकार रक्कमेच्या म्हणजेच रक्कम रू.४८.०६कोटी यावर मा.शासनाच्या निर्देशानुसार १०% टक्के वाढ केल्यास निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होवु अशाबाबत मे.कोहीनुर इन्फ्रास्ट्रक्श्चर यांनी दि.११/८/२०१० रोजी तसेच दिनांक १२/८/२०१० रोजी मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्श्चर यांनी पत्राद्वारे विनंती केलेली आहे देकार रक्कम चुकीची आकारली असे त्यांनी म्हटलेले आहे.

मा.सौ.ढोणे मा.सु. :- सध्याचे जकात ठेकेदार यांना १ महिन्याची मुदतवाढ दिलेली होती.

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री. सारसर :- होय दिली होती.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- स्थायी समितीने मुदतवाढ देण्याचे ठरविणे नंतर त्यांचेशी पत्रव्यवहार केला का ?

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री. सारसर :- होय मा.स्थायी समितीचे मंजूरी नुसार त्यांना त्याबाबत पत्र देण्यात आले होते. त्यांचे होकाराचे पत्र प्राप्त झाले नंतरच त्यांना वर्क ऑर्डर देण्यांत आलेली आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- सदर प्रकरणी आपण किती वेळा निविदा मागविल्या होत्या.

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री. सारसर :- एकूण चार वेळा निविदा मागविण्यांत आलेल्या होत्या.

मा.सौ.ढोणे मा. सु. :- मुदतवाढ ही वाढीव देकारानुसार देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- आपणास मुदतवाढ देतांना पूर्वीचेच देकार रकमे नुसार पूर्वीचेच अटी व शर्ती नुसार मुदतवाढ द्यावी लागेल.

मा.श्री. पवार बा.रे. **व** मा.श्री. भोसले ग.पुं. :- आपले महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत जकात वसुली करू शकणार नाही का ?

प्र.नगरसचिव श्री. पवळे एन.एम.:- महानगरपालिकेचे कर्मचारी जनगणना तसेच निवडणूकीचे कामासाठी नेमलेले असून स्टाफ कमी पडत असल्याने जकात वसुलीसाठी महानगरपालिका कर्मचारी उपलब्ध करणे अवघड आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- स्टाफ वाढविला पाहिजे.

मा.श्री.पवार बा.रे. :- आपण चार वेळेस जाहिर निविदा मागविल्या असता ही प्रतिसाद न मिळाल्याने तसेच महानगरपालिका स्टाफ उपलब्ध होवु शकणार नसलेने ठेकेदारास मुदतवाढ देण्यात यावी. कर्मचा-यांचे पगार, पेन्शन, वीज बीले इत्यादी आवश्यक खर्च तरी भागेल.

मा.सभापती साहेब :- मागील जकात ठेक्याचे देकार रक्कम रूपये ४८.०६ कोटी व इमारत फंड रूपये १.४० कोटी या रकमेवर दहा टक्के वाढ केल्यास किती वाढ होते ते सांगावे.

जकात विभाग वरिष्ठ लिपीक श्री. सारसर :- मागील वर्षी प्राप्त देकार रक्कम रूपये ४८.०६ कोटी व इमारत फंड रूपये १ कोटी ४० लाख यावर दहा टक्के वाढ धरल्यास ती रक्कम रूपये ५२ कोटी ८६ लाख व इमारत फंड रूपये १ कोटी ५४ लाख अशी एकूण रूपये ५४ कोटी ४० लाख ६० हजार येत आहे.

मा.श्री. पवार बा.रे :- सध्याचे जकात अभिकर्ता यांना दिनांक १/९/२०१० ते जकात निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत किंवा १ महिना यापैकी जो कमी कालावधी असेल अशा कालावधीसाठी जकात वसुली कामी पूर्वीच्याच अटी व शर्ती नुसार मुदतवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत यावी. तसेच मागील वर्षीचे प्राप्त देकार रक्कम व इमारत फंड यावर दहा टक्के प्रमाणे वाढ करून देकार रक्कम निश्चित करून जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- त्याप्रमाणे मंजूरी देण्यांत यावी.सदर सभेचे कार्यवृत्त कायम होण्यांची वाट न पहाता सदर प्रकरणी पुढील कार्यवाही तातडीने करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- जकात अभिकर्ता नेमणे कामी आपण चार वेळेस जाहिर निविदा मागविल्या असता ही प्रतिसाद न मिळाल्याने सध्याचे जकात अभिकर्ता यांना पूर्वीचेच अटी व शर्ती नुसार दिनांक १/०९/२०१० ते जकात निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत किंवा १ महिना यापैकी जो कमी कालावधी असेल अशा कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी. सन २०१०-२०११ या कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणे कामी प्राप्त देकार रूपये ४८ कोटी सहा लाख या रकमेवर १०% वाढवून येणारी रूपये ५२ कोटी ८६ लाख ६० हजार व इमारत फंड रूपये १ कोटी ४० लाख रकमेवर दहा टक्के वाढून येणारी रक्कम रूपये १ कोटी ५४ लाख यु.आय.डी.एस.एस.एम.टी. फेज-२ योजने अंतर्गत म.न.पा. हिस्सा पोटी घेवुन अशी एकूण ५४ कोटी ४० लाख ६० हजार देकार रक्कम निश्चित करून जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देण्यांत यावी. तसेच सदर प्रकरणी सभेचे कार्यवृत्त कायम होण्यांची वाट न पहाता पुढील कार्यवाही तातडीने करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये सन २०१०-२०११ या कालावधीत आयात होणा-या जकात पात्र मालावर महानगरपालिका कर्मचा-यांमार्फत अथवा जकात अभिकर्त्यामार्फत पुढिल एक महिन्याचे कालावधीस्तव मुदतवाढ देवुन जकात वसुली करणे तसेच जकात ठेक्याची ठरविलेल्या देकार रकमे बाबत प्राप्त पत्रा विषयी कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावार सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या जकात संकलन अभिकर्ता मे. सहकार एजन्सी प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०८/२००९ ते ३१/०७/२०१० या कालावधीसाठी मंजूरी केलेली एकूण देकार रक्कम व प्रशासकीय इमारतीचे बांधकामासाठी चे रकमेसहचे जकात वसुली दराचे प्रमाणात १ महिन्या करिता येणारी रक्कम रूपये ४,१२,१६,६६६/- (रूपये चार कोटी बारा लाख सोळा हजार सहाशे सहासष्ठ फक्त) एवढी रक्कम निश्चित करून मे. सहकार एजन्सी प्रा.लि. मुंबई यांना दिनांक ०१/०९/२०१० ते निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत किंवा १ महिना यापैकी जो कमी कालावधी असेल अशा कालावधीसाठी मागील अटी / शर्ती नुसार जकात वसुलीकरिता मुदतवाढ देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणूकीसाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक २ दिनांक २०/०१/२००९ अन्वये प्राप्त देकार रक्कम रूपये ४८ कोटी ०६ लाख व इमारत फंड रूपये १ कोटी ४० लाख या रकमेवर १०% (दहा टक्के) वाढवून येणारी रूपये ५२ कोटी ८६ लाख ६० हजार व यु.आय.डी.एस.एस.एम.टी. फेज-२ या योजने अंतर्गत पूर्ण करावयाच्या कामासाठी महानगरपालिकाच्या हिस्सापोटी रूपये १,५४,००,०००/-(रूपये एक कोटी चौपन्न लाख) याप्रमाणे देकार रक्कम निश्चित करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच सदर प्रकरणी सभेचे कार्यवृत्त कायम होण्यांची वाट न पहाता पुढील कार्यवाही तातडीने करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका